पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक ६

सभावृत्तांत

दिनांक:- १२/०८/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.“फ” प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक १२/०८/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता “फ” क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | सभापती |
| २. | मा. पौर्णीमा रविंद्र (आप्पा) सोनावणे | सदस्य |
| ३. | मा. साने स्वाती प्रमोद | सदस्य |
| ४. | मा. सायकर अजय शंकरराव | सदस्य |
| ५. | मा. जाधव साधना रामदास | सदस्य |
| ६. | मा.बहिरवाडे नारायण सदाशिव | सदस्य |
| ७. | मा. मंगलाताई अशोक कदम | सदस्य |
| ८. | मा. पवार संगीता शाम | सदस्य |
| ९. | मा. तानाजी विठठल खाडे | सदस्य |
| १०. | मा.बो-हाडे शुभांगी संजय | सदस्य |
| ११. | मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित | सदस्य |
| १२. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १३. | मा.भालेकर पंकज दत्तात्रय | स्विकृत सदस्य |
| १४. | मा.पवार जितेंद्र हनुमंत | स्विकृत सदस्य |
| १५. | मा. भालेकर प्रविण महादेव | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्री. मनोज लोणकर (प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी), श्री. सतिश इंगळे (कार्यकारी अभियंता स्थापत्य ), श्री. प्रविण घोडे (कार्यकारी अभियंता विदयुत ) श्री. लियाकत पिरजादे (कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा ) श्रीमती. प्रभावती गाडेकर (कार्यालयीन अधिक्षक), श्री. गायकवाड शहाजी ( उपअभियंता स्थापत्य), श्री. नरोटे एस.एस. ( उपअभियंता स्थापत्य), श्री. शिर्के डी.जे. (सहा. आरोग्याधिकारी ) ,श्री. कुलकर्णी एस.एस. (मुख्य आरोग्य निरीक्षक ) श्री. अतुल जोशी (कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा), श्री. वायाळ एल.ए. (कनिष्ठ अभियंता जलनि:सारण), प्राजक्ता गव्हाणे ( कनिष्ठ अभियंता उदयान सहाय्यक), श्री. तुकाराम गिरमकर मुख्य लिपीक, सुभाष पवार (क्रिडा पर्यवेक्षक), इ. अधिकारी सभेस हजर होते.

श्री. मनोज लोणकर यांनी केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान ( नागरी) अंतर्गत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे याविषयी माहिती दिली.

**सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष मा. सौ. मंदाकिनी अर्जुन ठाकरे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.**

अ. कार्यपत्रिका क्रमांक ५ दिनांक ०८/०७/२०१६ रोजी झालेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे असे मा. अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**विषय क्र. १** केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान ( नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/ २०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ भारत अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ९ संभाजीनगर, प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी हे दोन प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) जाहिर करण्यास मान्यता देणेत आलेली आहे. त्याचप्रमाणे फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ११ यमुनानगर हा प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत मा. क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव

**मा. सभापती यांचे संमतीने खालील प्रमाणे विषय ऐनवेळी सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र. २** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी झिरो बॉईज चौकातील व्यायामशाळेची इमारत ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्रासाठी देणेस मा. आयुक्त सो यांनी मान्यता देणेत आलेली आहे सदर इमारतीस **“कै. बबनराव ऊर्फ आण्णा कापसे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र”** असे नामकरण करणेबाबत.
मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन व मा. मासुळकर समीर मोरेश्वर यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय क्र. ३** पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने के.एस.बी. चौक चिंचवड या ठिकाणी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भव्य असे शिल्प उभारण्यात आलेले आहे.

त्यालगत नव्याने उडडाणपूल उभारण्यात येत आहे. या उडडाणपुलास "**राजर्षी छत्रपती शाहू महाराज उडडाणपूल**" असे नामकरण करणेबाबत.

मा.बहिरवाडे नारायण सदाशिव व मा. साने स्वाती प्रमोद यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ४** फ प्रभाग समिती मधील ठराव क्रमांक ३३ दिनांक १३/८/२०१४ रदद करुन "**मनपा शाळा क्रमांक ९०,९१**" हेच नामकरण करणेबाबत...

मा. साने स्वाती प्रमोद व मा. जाधव साधना रामदास यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ५** प्रभाग क्र. ५ कुदळवाडी जाधववाडी येथील खालील प्रमाणे नामकरण करणेबाबत.

**१. वस्ताद कै. नथोबा दगडू आहेर चौक जाणता राजा प्रतिष्ठान आहेरवाडी चिखली**
**२. श्री. वीर महाराज मंदिर, कुदळवाडी**
**३. स्वामी समर्थ सेवा केंद्र व बाळसंस्कार केंद्र, सेक्टर नं १६ राजे शिवाजीनगर**
**४. श्री. पवनपुत्र हनुमान मंदिर**

मा. साधना रामदास जाधव व मा. श्री. स्वाती प्रमोद साने यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ६** प्रभाग क्र. ४ शिवतेजनगर येथील खाणीजवळ **गणपती विसर्जन घाट तयार करणे. येथे मनपा मार्फत मंडप , बोंटींग,विदयुत, संरक्षण, जीवरक्षक व इतर व्यवस्था करणेबाबत.**

मा. बहिरवाडे नारायण सदाशिव व मा. सायकर अजय शंकरराव यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ७** **प्रभाग क्र. १ रुपीनगर तळवडे येथील बंद वाचनालयाच्या खोलीचा वापर ज्येष्ठ नागरिकांना तात्पुरत्या स्वरुपात देणेबाबत.**

मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा. जाधव साधना रामदास यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ८** **राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती महोत्सव सन २०१६ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणे. या कामास येणा-या अंदाजपत्रकीय खर्च र.रु. ४,९९,७००/- च्या खर्चास मान्यता देणेबाबत.**

कार्यकारी अभियंता (स्था) यांचेकडील फक्षेका/स्था/कावि/७६८ दि. ९/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय क्र. ९** प्रभाग क्रमांक ९ येथील नव्याने बांधण्यात आलेल्या जलतरण तलावाचे नामकरण "**साई अक्वामरिन स्विमिंग पूल, संभाजीनगर (Sai Aquamarine Swimming Pool, Sambhajinagar)**" असे नामकरण करणेबाबत.

मा. मंगलाताई अशोक कदम व मा. बहिरवाडे नारायण सदाशिव यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

ठराव क्र. १४ विषय क्र. १
दि. १२/०८/२०१६ विभाग – आरोग्य
सुचक:- मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक:- मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
संदर्भ:- क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्रमांक फक्षेका/आ.२/कावि/८६६/२०१६ दिनांक ८/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय -** केंद्र शासनाने देशातील सर्व शहरातील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासुन स्वच्छ भारत अभियान ( नागरी) संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि/३४ दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ भारत अभियान (नागरी ) राबविण्याचे ठरवून दिनांक २/१०/२०१७ पर्यंत हगणदारी मुक्त (Open Defecation Free) शहरे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. तसेच मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. मातवी/१२/कावि/९६/२०१६, दिनांक १/४/२०१६ अन्वये दिनांक २/१०/२०१७ पूर्वी टप्याटप्याने पिंपरी चिंचवड शहर हगणदारी मुक्त (Open Defecation Free) करण्याचे उद्दीष्ट निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने फ क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ९ संभाजीनगर, प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी हे दोन प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) जाहिर करण्यास मान्यता देणेत आलेली आहे .
त्याचप्रमाणे फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ११ यमुनानगर या वॉर्ड / प्रभागामध्ये नागरिक उघडयावर शौचास जात असल्याचे दिसून येत नाही. यास्तव **प्रभाग क्र. ११ यमुनानगर हा वॉर्ड / प्रभाग हगणदारी मुक्त (Open Defecation Free) जाहिर करणे.**

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

**----**

ठराव क्र. १५ विषय क्र. २
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक:- मा. मासुळकर समीर मोरेश्वर
संदर्भ:- मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन व मा. मासुळकर समीर मोरेश्वर यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनी झिरो बॉईज चौकातील व्यायामशाळेची इमारत ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्रासाठी देणेस मा. आयुक्त सो यांनी मान्यता देणेत आलेली आहे सदर इमारतीस **"कै. बबनराव ऊर्फ आण्णा कापसे ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र"** असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

ठराव क्र. १६ विषय क्र. ३
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा.बहिरवाडे नारायण सदाशिव अनुमोदक:- मा. साने स्वाती प्रमोद
संदर्भ:- मा.बहिरवाडे नारायण सदाशिव व मा. साने स्वाती प्रमोद यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने के.एस.बी. चौक चिंचवड या ठिकाणी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे भव्य असे शिल्प उभारण्यात आलेले आहे. त्यालगत नव्याने उडडाणपूल उभारण्यात येत आहे. या उडडाणपुलास **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज उडडाणपूल"** असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**---**

ठराव क्र. १७ विषय क्र. ४
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा. साने स्वाती प्रमोद अनुमोदक:- मा. साधना जाधव रामदास
संदर्भ:- मा. साने स्वाती प्रमोद व मा. जाधव साधना रामदास यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** फ क्षेत्रीय कार्यालय प्रभाग क्र. ३ मधील चिखली येथील आरक्षण क्रमांक १/९९ गट नं. १६४४ येथील जागेवर मनपाकडुन शाळा इमारतीचे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे सदरच्या शाळा इमारतीसाठी **"कै. गोपाळ गणपती मोरे, पोलिस पाटील"** असे नामकरण करण्याबाबत ठराव क्रमांक ३३, विषय क्रमांक १२ दि. १३/०८/२०१४ रोजी मान्यता देण्यात आलेली आहे .

तरी सदर ठराव क्रमांक ३३ दिनांक १३/८/२०१६ रदद करुन शाळेस **"मनपा शाळा क्रमांक ९०,९१"** असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

ठराव क्र. १८ विषय क्र. ५
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा. जाधव साधना रामदास अनुमोदक:- मा. साने स्वाती प्रमोद
संदर्भ:- मा. जाधव साधना रामदास व मा. श्री. साने स्वाती प्रमोद यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** प्रभाग क्र. ५ कुदळवाडी जाधववाडी येथील खालील प्रमाणे नामकरण करणे.

**१. वस्ताद कै. नथोबा दगडू आहेर चौक जाणता राजा प्रतिष्ठान, आहेरवाडी, चिखली**
**२. श्री. वीर महाराज मंदिर, कुदळवाडी**
**३. स्वामी समर्थ सेवा केंद्र व बाळसंस्कार केंद्र, सेक्टर नं १६ राजे शिवाजीनगर**
**४. श्री. पवनपुत्र हनुमान मंदिर**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**----**

ठराव क्र. १९ विषय क्र. ६
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा. बहिरवाडे नारायण सदाशिव अनुमोदक:- मा. सायकर अजय शंकरराव
संदर्भ:- मा. बहिरवाडे नारायण सदाशिव व मा. सायकर अजय शंकरराव यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** प्रभाग क्र. ४ शिवतेजनगर येथील खाणीजवळ शाहुनगर, पुर्णानगर, घरकुल, शिवतेजनगर येथील घरगुती व सार्वजनिक गणपती विसर्जनासाठी येतात.
**सबब प्रभाग क्र. ४ शिवतेजनगर येथील खाणीजवळ गणपती विसर्जन घाट तयार करणे. येथे मनपा मार्फत मंडप , बोंटींग,विदयुत, संरक्षण, जीवरक्षक व इतर व्यवस्था करणे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**----**

ठराव क्र. २० विषय क्र. ७
दि. १२/०८/२०१६ विभाग –
सुचक:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे अनुमोदक:- मा. जाधव साधना रामदास
संदर्भ:- मा. पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे व मा. जाधव साधना रामदास यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** प्रभाग क्र**.** १ रुपीनगर तळवडे येथील वाचनालय बंद असलेने तेथील खोली पावसामुळे गैरसोय होणा-या ज्येष्ठ नागरिकांना दिल्यास तिचा उपयोग होईल.
तरी प्रभाग क्र. १ रुपीनगर तळवडे येथील बंद वाचनालयाच्या खोलीचा वापर करणेकामी ज्येष्ठ नागरिकांना तात्पुरत्या स्वरुपात देणे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्र. २१ विषय क्र. ८
दि. १२/०८/२०१६ विभाग – स्थापत्य विभाग
सुचक:- मा. जाधव साधना रामदास अनुमोदक:- मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
संदर्भ:- कार्यकारी अभियंता (स्था) यांचेकडील फक्षेका/स्था/कावि/७६८ दि. ९/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव**.**

**विषय -** मा. आयुक्त यांचे दि. २०/०६/२०१६ क्र. माजसं/४/कावि/८१/२०१६ रोजीचा आदेश व मा. आयुक्त सो यांची दि. १५/०७/२०१६ चे मंजुर टिपणीनुसार राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती महोत्सव सन २०१६ अनुषंगाने मंडप विषयक कामे करणे व साई उदयान, थरमॅक्स चौक चिंचवड या ठिकाणी मंडप, खुर्च्या, टेबल, झालर, रोस्टम, इ. विविध बाबींचा समावेश असलेले कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खाते विभाग पुणे यांचेकडील सन २०१३-१४ च्या दर सुचीनुसार तयार केलेले आहे, त्याचा अंदाजपत्रकीय खर्च र.रु. ४,९९,७००/- च्या खर्चास मान्यता देणे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. २२ | विषय क्र. ९

दि. १२/०८/२०१६ | विभाग –

सुचक:- मा. मंगलाताई अशोक कदम | अनुमोदक:- मा. बहिरवाडे नारायण सदाशिव

संदर्भ:- मा. मंगलाताई अशोक कदम व मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचा दि. १२/८/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

**विषय -** प्रभाग क्रमांक ९ येथील नव्याने बांधण्यात आलेल्या जलतरण तलावाचे नामकरण "**साई अक्वामरिन स्विमिंग पूल, संभाजीनगर (Sai Aquamarine Swimming Pool, Sambhajinagar)**" असे नामकरण करणे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

मासिक सभेमध्ये उपस्थित विविध विभागांतील तक्रारी , कार्यवाही याबाबत नगरसदस्यांनी दिलेल्या सूचनांची संबंधित जबाबदार अधिका-यांनी दखल घेवुन त्याबाबत त्वरीत पुर्तता करणेबाबत मा. सभापती यांनी सूचना दिल्या. यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(ठाकरे मंदाकिनी अर्जुन )
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक:- फक्षेका/सभा/कावि/३४८/२०१६

दिनांक:- २२/०८/२०१६

सही/-
(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय